# पर्यटन संचालनालय (DOT), महाराष्ट्र शासन

## विभागीय पर्यटन कार्यालय, पुणे, विभाग पुणे.

पत्ता: आय बरॅक, सेन्ट्रल बिल्डींग, पुणे - 411 001.
दुरध्वनी क्र. 020-29900289/8080035134.
वेबसाईट : www.maharashtratourism.gov.in
ईमेल आयडी : ddtourism.pune-mh@gov.in

जा.क्र./विपका/पुणे/प.सं/ टू.गा.प्र./२०२६/२८४ दिनांक - १७/०३/२०२६

17 MAR 2026

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन,
प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी),
पुणे.

**विषय :- पुणे विभागातील इच्छुक युवक/युवतींसाठी Tourist Guide Training सदरबाबत प्रचार व प्रसिध्दी मिळणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, पर्यटन संचालनालयामार्फत नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना अंतर्गत पुणे विभागातील इच्छुक युवक/युवतींसाठी Tourist Guide Training आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये पर्यटन स्थळांवर मार्गदर्शन, आदरातिथ्य सेवा व पर्यटन संबंधित कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तरी, सदर **Google Form Link** आपल्या वेबसाईटवर प्रसारीत करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(भरत लांघी),
उपसंचालक,
पर्यटन संचालनालय,
प्रादेशिक कार्यालय, पुणे.

सोबत – प्रेस नोट.

## प्रेस नोट

## पर्यटन संचालनालयातर्फे सातदिवसीय प्रशिक्षण संधी

पर्यटन संचालनालयामार्फत नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना अंतर्गत पुणे विभागातील इच्छुक युवक/युवतींसाठी Tourist Guide Training आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये पर्यटन स्थळांवर मार्गदर्शन, आदरातिथ्य सेवा व पर्यटन संबंधित कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यात येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक पर्यटन स्थळांची माहिती करून देण्यासाठी पर्यटन संचालनालयामार्फत पर्यटन सुलभ मार्गदर्शक (टूर गाइड) तयार करण्यात येणार आहे. यासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी गुगल फॉर्मवर अर्ज करावेत, असे आवाहन पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक श्री. भरत लांघी यांनी केले आहे. पुणे प्रादेशिक विभागातील (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) इच्छुक उमेदवारांना सहभाग घेता येईल. पुणे प्रादेशिक विभागातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांबाबत पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी एकूण २०० युवकांना प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यटन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

२. ग्वाल्हेरचे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अॅन्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट (आयटीटीएम) तसेच महाराष्ट्र पर्यटन संचालनालयातील तज्ञ प्रशिक्षक प्रशिक्षण देणार आहेत. सात दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थांना पर्यटन प्रमाणपत्र संचालनालयाकडून देण्यात येईल. सिंहस्थ कालावधीत टूर गाइड म्हणून काम करण्यासाठी ओळखपत्र देण्यात येणार आहे. फिरस्तीची आवड असलेल्या युवकांनी प्रशिक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. भरत लांघी यांनी केले आहे.

३. इच्छुक नोंदणीसाठी गुगल फॉर्मवर उपलब्ध करून दिली असून, दि. २० मार्च, २०२६ अखेर दु. ३.०० वाजेपर्यंत दिलेल्या मुदतीत अर्ज करायचा आहे. अर्जांची निवड प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केली जाईल.

**अर्ज करण्यासाठी लिंक :**

**https://docs.google.com/forms/d/e/१FAIpQLScbn०rmXID८oR८hfCD_Zdx१PyHbLDcUeAynPwPWHs५RgVKG४Q/viewform?usp=publish-editor**

लिंकवर नोंदणी करता येईल. तसेच, अधिक माहितीबाबत प्रादेशिक पर्यटन कार्यालय, पुणे या कार्यालयाचा दुरध्वनी क्र. ८०८००३५१३४ यावर संपर्क साधता येईल.

**४. प्रशिक्षण पात्रता निकष-**

वयोमर्यादा : किमान १८ व कमाल ४५ वर्षे

शैक्षणिक पात्रता: किमान कोणत्याही शाखेतील पदवीधर